


गुरुजी कृष्णानंद (१९३९–२०१२)

## प्रकाश

प्रकाश, हा भौतिक प्रकाश नसून सूक्ष्म पातळीवरचा प्रकाश आहे, जो सर्व निर्मितीचा स्त्रोत आहे. प्रेम, शांती, सत्य, बुद्धी आणि सर्व जीवनाचा तो स्त्रोत आहे. हा प्रकाश म्हणजेच देव.

## प्रवहन

म्हणजे प्रकाशाला हेतूपुर्वक आपल्या शरीरात येण्याची अनुमती देऊन त्यानंतर पूर्ण जगात त्याला पसरिवणे. आपले शरीर प्रकाशाला स्थूल पातळीत बदलते. ही प्रकाशाची कंपनं, सर्व प्राणिमात्र आणि निसर्गात पोहोचतात. त्यात प्रेम, शांती, सकारात्मकता आणि हीलिंग अशा वेगवेगळ्या शक्ती असतात, त्या परिवर्तनासाठी मदत करतात. माणसं अजून चांगली होतील आणि हे जग, एक अजून चांगली जागा असेल.

## तंत्र

तुमच्यावर प्रकाशाचा महासागर आहे अशी कल्पना करा. आता हा प्रकाश खाली येऊन तुमच्या पूर्ण शरीरात भरतो आहे अशी कल्पना करा. आता प्रेम, प्रकाश आणि शांती ह्याचा एक मिनीटभर अनुभव घ्या. आता कल्पना करा की हा प्रकाश हळूहळू तुमच्या शाळेत, परिसरात, राज्यात, देशात आणि मग संपूर्ण जगात पसरतो आहे.

ह्याचा कमीतकमी ७ मिनीटे सराव करा.

## प्रकाश प्रवहन जागतिक चळवळ

गुरुजी कृष्णानंद, संस्थापक सप्तर्षी मार्ग, ह्यांनी १८ मे २००८ रोजी ह्या चळवळीची सुरुवात केली. ही चळवळ म्हणजे, रोज कमीतकमी ७ मिनिटांसाठी, झोपेतून उठल्यानंतर आणि झोपण्यापुर्वी, आपापल्या घरातून प्रकाश प्रवहन करणे. ह्या चळवळीचा मुख्य उद्देश, पृथ्वीवर शांतता नांदावी, हा आहे.

## चळवळीची खास वैशिष्ट्ये

- प्रकाशाने एकात्मता
- धर्मनिरपेक्ष, जागतिक
- कुठलेही नियम आणि अटी नाहीत
- कुठलेही सदस्यत्व नाही
- प्रत्येकजण शांततेसाठी योगदान देऊ शकतो
- वैयक्तिक आणि जागतिक मदत
- आपल्याला आणि जगाला नवीन युगात प्रवेश करण्यास मदत करते.

# प्रकाश प्रवहन

भाग १ अंक १० द्वै–मासिक पत्रिका मार्च–एप्रिल २०२५

## संदेश

### गुरुजी कृष्णानंद

(गुरुजींच्या १३ मे २०१२ या दिवशीच्या भाषणातील काही वेचे)

अनुवादः मेधा कुलकर्णी

**ऐहिक जगातील माझ्या महत्वाकांक्षा पूर्ण होण्यास प्रकाश मदत करतो का?**

होय. अगदी निश्चितपणे. तुमच्या सर्व महत्वाकांक्षा, मग त्या ऐहिक असोत की आध्यात्मिक, पूर्ण होण्यास प्रकाश मदत करतो. मात्र त्यासाठी तुम्ही प्रयत्न करायला हवेत. प्रयत्न केल्याशिवाय आपण काहीही साध्य करू शकत नाही. तुम्ही प्रकाश सोबत बाळगू शकता आणि प्रकाश पाठवू शकता, पण तुम्ही प्रयत्न करायलाच हवेत.

प्रकाशामुळे कोणतीही महत्वाकांक्षा पूर्ण होण्यास मदत होईल, परंतु आपण समंजस असायला हवे. आपल्या महत्वाकांक्षा अवास्तव नकोत. तुमच्या आध्यात्मिक ध्येयाच्या आड ऐहिक महत्वाकांक्षा यायला नकोत. त्याच वेळी, तुमच्या आध्यात्मिक महत्वाकांक्षा तुमच्या ऐहिक ध्येयांच्या आड येऊ नयेत!

ऐहिक आणि आध्यात्मिक अशी दोन्ही ध्येये महत्वाची आहेत. तुम्ही जर ऐहिक आयुष्यात यशस्वी झालात, तरच आध्यात्मिक आयुष्यात यशस्वी व्हाल. आणि त्याचप्रमाणे जेव्हा तुम्ही आध्यात्मिक आयुष्यात यशस्वी होता, तेव्हाच तुम्ही ऐहिक आयुष्यात यशस्वी व्हाल.

तुम्ही तुमच्या ऐहिक आणि आध्यात्मिक आयुष्यांमध्ये समतोल राखायला हवा. एकालाही दुर्लक्षित करता कामा नये. 'आध्यात्मिकता' म्हणजे ऐहिक आयुष्य समंजसपणे, संतुलितपणे जगणे होय.

## संस्मरणीय घटना

जयंत देशपांडे, अनुवादः वैशाली जोशी

असे म्हटले जाते की महत्तम गोष्टींची सुरुवात ही नेहमीच नम्रतेने होत असते. बऱ्याच वर्षांपूर्वी जेव्हा आम्ही जागतिक प्रवहन दिवस साजरा करण्यास सुरुवात केली, तेव्हा आम्ही कल्पना देखील केली नव्हती की, एके दिवशी लाखो लोक आमच्या ह्या आनंदोत्सवात सहभागी होतील.

सर्व लोकांना परिपूर्ण सुसंवादात राहताना पाहणे हे आमचे स्वप्न आहे. ते खरोखर शक्य आहे का? ते शक्य आहे हे आम्ही महान गुरूंकडून शिकलो आहोत. हजारो वर्षांपूर्वी लोक परिपूर्ण सुसंवादात राहात होते. आपण पुन्हा ह्या जगात तसाच सुसंवादीपणा आणि शांती स्थापित करू शकतो. प्रकाश प्रवहनाच्या सरावाने आणि सकारात्मकपणे जगण्याने ह्यास मदत होते.

## प्रकाश प्रवहनाचे कार्य

मनोज चोप्रा, अनुवादः मेधा कुलकर्णी

मानसा कुटुंबासाठी १५वा जागतिक प्रकाश प्रवहन दिन अतिशय संस्मरणीय ठरला. शंभरपेक्षा जास्त स्वयंसेवक एकाच ध्येयपूर्तीसाठी काम करत होते – सर्व जगापर्यंत प्रकाश पोहोचवणे. काहीजणांनी पुढे होऊन, पुढच्या फळीत येऊन काम केले, तर काहींनी पडद्यामागे राहूनही तितकीच महत्वाची भूमिका पार पाडली. प्रत्येकाची कामगिरी – ती मोठी असो की छोटी असो – या दिवसाच्या महान् यशासाठी महत्वपूर्ण ठरली.

जागतिक प्रकाशप्रवहन दिनी ७ लाखांपेक्षा जास्त मुलांनी आणि मोठ्या माणसांनी प्रकाशप्रवहन केले. काही ठिकाणी लोकांनी छोटे छोटे गट केले आणि ते आमच्या ऑनलाईन कार्यक्रमात सहभागी झाले. मला वाटते, प्रत्येक छोटा मोठा थेंब पाण्याची पातळी वाढवण्यास हातभार लावतो. प्रख्यात नाटककार आणि तत्त्वज्ञानी, हॉवर्ड झिन यांनी अतिशय सुंदर शब्दात सांगितले आहे, "छोटीशी कृती जर लाखो लोकांनी केली, तर जग बदलून जाऊ शकते." हे जग राहण्यासाठी अधिक चांगले, आनंददायी होण्यासाठी आपण सर्व आपापली भूमिका योग्य प्रकारे पार पाडू या.

मानसा फाउंडेशन (र)
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर– बागलूर रोड), बंगलोर अर्बन ५६००७७, भारत
फोनः ९९०००७५२८० (सकाळी १० ते ५)
इ–मेलः info@lightagemasters.com वेबसाइटः www.lightagemasters.com, www.lightchannels.com

## ऋषींची अनमोल वचनं
### अनुवादः भुवन दिवेकर

- आपल्या सर्वांमध्ये जागृत होण्याची क्षमता आहे. ज्या ऊर्जा आता पसरवल्या जात आहेत, त्या आपल्या जागृतिकरणासाठी लागणारी परिस्थिती तयार करतात. ऊर्जा आपल्याला विना-तोशिष जागृती देणार नाहीत. ते कष्ट आपल्यालाच करावे लागतील.
- आपण ह्या गोष्टीची जाणीव ठेवूया की आपण अजूनही कलियुगातून सत्ययुगाकडे जाणाऱ्या संक्रमण काळात आहोत. आणि आपण जर हे मान्य केलं की आपण परिपूर्ण नाही आणि आपण अत्यंत कठीण काळातून जात आहोत, तर आपल्यात प्रचंड संयम येईल.
- आपण जेव्हा ध्यान करतो आणि स्तब्धतेच्या पातळीवर पोहोचतो, तेव्हा आपल्याला एका अस्तित्वाची जाणीव होते. जरी आपण ध्यान करत नसलो, आणि फक्त आपल्या जाणिवेचा विस्तार केला आणि तिला वरच्या पातळीवर नेले, तरी आपल्याला त्या अस्तित्वाची जाणीव होते. ह्या अस्तित्वामध्ये सगळं आहे – प्रेम, शांतता, कृपा आणि आपल्याबद्दलची काळजी.
- ह्या पृथ्वीवर सगळ्या गोष्टींमध्ये चढ-उतार आहेत; काहीच स्थिर नाही. जसं दिवस आणि रात्र आहे, तसं ध्यानात सुद्धा चढ-उतार आहेत. समान प्रयत्न करून सुद्धा कधी कधी मनाप्रमाणे ध्यान होत नाही. ह्याच्यामागे बहिर्मुख कारणं असतात.
- आध्यात्मिक जागृती ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. एखादी व्यक्ती एखाद्या उच्च वास्तवाबद्दल जागृत होते. मग त्याहून अधिक उच्च वास्तवाबद्दल जागृत होण्यासाठी ती तिची साधना पुढे सुरू ठेवते. जोपर्यंत आपण स्त्रोताकडे म्हणजेच देवाकडे परतत नाही, तोपर्यंत ही जागृत होण्याची प्रक्रिया सुरू राहते.
- प्राणशक्ती केवळ आपल्यातच प्राण ओतते असं नाही तर, संपूर्ण निर्मितीत प्राण ओतते. प्राणशक्ती आपल्याला हुरूप देते आणि सगळ्या संकटांशी सामना करत जगण्यासाठी ताकद देते.
- आपल्यासाठी काय चांगलं आहे हे समजण्यासाठी, आपण आपली जाणीव वरच्या पातळीवर नेऊन विश्वाशी किंवा अस्तित्वाशी वार्तालाप केला पाहिजे. आपल्याला मार्गदर्शन करायला, सांत्वन करायला आणि आपल्याला विपुलतेते न्हाऊ घालायला, विश्व वाट बघत असते. एकदा का आपण विश्वाबरोबर संपर्क प्रस्थापित करून त्यावर झोकून देऊन विश्वास ठेवला की, आपलं आयुष्य बदलतं.
- प्रत्येकाला स्वतःच्या कर्माचं शिवधनुष्य स्वतःलाच पेलायला लागतं. ज्याला त्याला स्वतःच्या कर्मबंधातून जावंच लागतं, ज्यातून शिकायची संधी मिळते.
- काहीजण सतत चांगलं असायचा प्रयत्न करतात; त्यात चुकीचं काहीच नाही पण त्यांनी खरंच चांगलं असलं पाहिजे. ते वरवरचं नसावं. तो चांगुलपणा आतून, हृदयातून यायला हवा.

–गुरुजी कृष्णानंद



१५व्या 'जागतिक प्रकाशप्रवहन दिना' निमित्त ३१ जानेवारी २०२५ रोजी कर्नाटक आणि महाराष्ट्रातल्या अनेक शाळांमधील विद्यार्थ्यांनी प्रकाश प्रवहन केले.



३१ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या १५व्या 'जागतिक प्रकाशप्रवहन दिना' निमित्त पुण्यातील एका शाळेच्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन मार्गदर्शित सत्रात भाग घेतला.



मानसा फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी १५व्या 'जागतिक प्रकाशप्रवहन दिना'चे यश साजरे केले.

## १५वा जागतिक प्रवहन दिन – एक वृत्तांत

मनोज चोप्रा, अनुवाद : वैशाली जोशी

१५वा जागतिक प्रवहन दिन हा जणू स्वप्न सत्यात उतरल्यासारखा होता! गुरुजी कृष्णानंद म्हणत असत, “काळ भर्रकन उडून जातो”, आणि त्यांचे शब्द किती खरे आहेत! असे वाटते, जणू आम्ही आमचा प्रवास कालच सुरू केला आहे. प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ मे २००८ मध्ये सुरू झाली, आणि नोव्हेंबर २००९ मध्ये गुरुजींनी एक गट तयार केला आणि आम्हाला शाळांना व इतर जागांना भेट देण्याचे निर्देश दिले. २०११ साली, आम्ही जागतिक प्रवहन दिन साजरा करण्यास सुरुवात केली. सोळा वर्षांच्या ह्या प्रवासाने आम्हाला जपून ठेवण्याजोग्या अद्भुत आठवणी दिल्या आहेत.

प्रत्येक जागतिक प्रवहन दिन हा आमच्यासाठी एक भावनिक उपक्रम असतो. त्या दिवशी प्रवाहित केला जाणारा प्रकाश हा आमचे प्रिय गुरू महर्षी अमर यांना त्यांच्या जयंतीनिमित्त भेट असते. ह्या दिवसाच्या जवळजवळ दोन महिने आधी, संपूर्ण मानसा कुटुंब ह्या महान उपक्रमासाठी तयारी करण्यास सुरुवात करते. आमचे स्वयंसेवक उत्साहाने काम करण्यास सुरुवात करतात आणि जास्तीत जास्त प्रकाश खाली आणणे हे त्यांचे ध्येय असते. आमचे क्षेत्र समन्वयक आता नियोजन करण्यात अनुभवी झाले आहेत, आणि स्वयंसेवक योजना अंमलात आणण्यास परिपूर्ण आहेत. त्यांचे एकमेकांशी सुंदर नाते आहे ज्यामुळे कार्य काटेकोरपणे आणि सलोख्याने पूर्ण करण्यास मदत होते.

कार्यात सहभागी असलेल्या अनेक वेगवेगळ्या गटांनी नव्या जोमाने आणि उत्साहाने काम केले. अधिक लोकांनी मार्गदर्शित ऑनलाईन सत्रांमध्ये भाग घ्यावा ह्या उद्देशाने सोशल मीडिया टीमने प्रकाश प्रवहनाची जाणीव पसरविण्यासाठी सर्जनशीलपणे मोहीम राबवली. त्यांच्या नावीन्यपूर्ण मोहिमेच्या प्रभावामुळे आम्ही हजारो नवीन लोकांपर्यंत पोहोचू शकलो.

दरवर्षीप्रमाणे, आमच्या स्वयंसेवकांनी योद्ध्यांप्रमाणे काम केले. त्यांना त्यांच्या कामात तसेच त्यांच्या वैयक्तिक जीवनात देखील अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले, पण त्यांनी त्यांचे लक्ष ध्येयावर केंद्रित ठेवले. त्यांच्या समर्पणासमोर सर्व आव्हाने लहान वाटत होती. नि:स्वार्थ समर्पण आणि शुद्ध हेतू नेहमीच उत्तम फलनिष्पत्ती देतात. जागतिक प्रवहन दिनी, आमचे स्वयंसेवक १६०० शाळांना संपर्क करू शकले आणि त्यांनी ७.३ लाखांपेक्षा जास्त मुले व प्रौढांना प्रकाश प्रवाहित करण्यास मदत केली. इंग्रजी, मराठी, हिंदी व कन्नड भाषांमध्ये सहा ऑनलाईन सत्रे आयोजित करण्यात आली. ह्या ऑनलाईन सत्रांमध्ये हजारो लोक सहभागी झाले. अनेक लोक प्रकाश प्रवहन करण्यासाठी लहान गटांमध्ये एकत्र जमले. प्रकाश प्रवहन करणाऱ्या अनेक लोकांनी त्यांचे अनुभव सांगितले. अनेकांनी अपरिमित शांती अनुभवली. काही जणांनी सांगितले की सत्रांदरम्यान ते स्तब्धता अनुभवू शकले. असे वाटते जणू प्रकाश प्रवहनाच्या जागतिक चळवळीचा प्रसार करण्याच्या आमच्या कामात आम्ही एका नवीन टप्प्यात प्रवेश केला आहे.

आमच्या गुरुजनांच्या आशीर्वादाने, १५वा जागतिक प्रवहन दिन खूप यशस्वी झाला. ह्या प्रसंगी, ह्या चळवळीचा प्रसार करण्याच्या आमच्या प्रयत्नांमध्ये पाठिंबा देणाऱ्या आमच्या स्वयंसेवकांबद्दल, शिक्षकांबद्दल, शालेय अधिकाऱ्यांबद्दल आणि सर्व प्रकाश प्रवाहकांबद्दल माझे हृदय कृतज्ञतेने भरून आले आहे. लोकांचा सहभाग आम्हाला आणखी उत्साहाने काम करण्यास प्रेरित करतो.

१५वा जागतिक प्रवहन दिन हा आमच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. आमचे खरे ध्येय आहे नवीन युगाची स्थापना करण्यासाठी आपल्या ऋषींच्या कार्यात हातभार लावणे. मला वाटते की ह्या महान ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी आपल्याला ह्या वाटेवरील अनेक सुंदर टप्पे पार करावे लागतील. ह्यासाठी किती दशके किंवा किती जन्म लागतील ह्याचे भाकीत जरी आपण करू शकत नसलो, तरी आपल्या गुरुंनी आपल्याला आश्वासन दिले आहे की आपण निश्चितच ध्येयापर्यंत पोहोचू. आपण आपला हा सुंदर प्रवास एकत्र साजरा करूया. ■

### शाळांना आवाहन

जागतिक प्रकाश प्रवहन चळवळीला सशक्त करण्यासाठी, सकाळच्या प्रार्थनेच्या आधी किंवा पहिल्या तासाच्या आधी, ३ ते ७ मिनिटे प्रकाश प्रवहनाचा सराव करावा.

### शाळांमधील प्रकाश प्रवहन

| | |
|---|---|
| सहभागी शाळा | : ६१७५ |
| प्रकाश प्रवहन केलेले विद्यार्थी | : ३०.९८ लाख |
| नियमित प्रकाश प्रवहन करणाऱ्या शाळा | : : ५०८ |
| नियमित प्रकाश प्रवहन करणारे विद्यार्थी | : २.२१ लाख |

दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी सकाळी ११ ते ११.३० पर्यंत **प्रकाश प्रवहनाचे मार्गदर्शित ऑनलाईन सत्र** आयोजित करण्यात येईल, जे सर्वांसाठी खुले असेल. खाली दिलेल्या लिंकद्वारे ह्या सत्रात सहभागी होता येईल:

www.lightagemasters.com

नियमित प्रकाश प्रवहनाचा लाखो लोकांना फायदा झाला आहे. अनेकांना कल्पनातीत मदत मिळाली आहे आणि सुंदर अनुभव आले आहेत. तुमचा अनुभव दुसऱ्यांना प्रेरणा देऊ शकतो आणि मार्गदर्शक ठरू शकतो. कृपया आपला अनुभव आम्हाला कळवा.



info@lightagemasters.com

अनेक मुलं, शिक्षक आणि स्वयंसेवकांचे अनुभव “Experiences of Light Channels” ह्या पुस्तकात संकलित केले आहेत. पहिला खंड प्रकाशित झाल्यावर अनेकांनी त्यांचे अनुभव आम्हांला सांगितले, म्हणून दुसरा खंड प्रकाशित केला. तुम्हाला हे दोन्ही खंड आमच्या संकेतस्थळावरून नि:शुल्क डाऊनलोड करता येतील.

www.lightchannels.com





## १५व्या जागतिक प्रकाशप्रवहन दिनाचे अनुभव

(संकलन: वैशाली जोशी, अनुवाद: प्रतिभा ओक, पद्मजा बाजपेयी)

'जागतिक प्रकाशप्रवहन दिनी' जेव्हा मी सकाळी आठ वाजताच्या थेट सत्रात सामील झालो, तेव्हा माझ्या शरीरात वेगाने येणारा व पृथ्वीवर पसरणारा प्रकाश मी अनुभवू शकलो. संपूर्ण सत्रामध्ये मी शांतीचा अनुभव घेतला.

नऊ वाजताच्या सत्रात मी प्रकाशाला प्रार्थना केली की माझ्यातून जास्त प्रकाश वाहू दे. मी संपूर्ण शरणागत भावाने स्वतःला प्रकाशाला समर्पित केले. काही सेकंदातच खूप सारा प्रकाश माझ्यातून वाहत आहे, हे मला जाणवले आणि मी विस्तारत आहे ही जाणीव मला झाली आणि मी निर्विचारी अवस्थेत प्रवेश केला. आणखी काही सेकंदानंतर मला जाणवले की मी अजून विस्तारित होत आहे आणि माझा स्वतःवरचा ताबा हरवत आहे. हा अनुभव खूप गहन आणि परिपूर्ण होता आणि मला अजून खोलवर जायचे होते. माझ्या मनात विचार आला की माझे भान हरपू शकते, आणि काही सेकंदातच मी माझ्या नैसर्गिक अवस्थेत आलो. तेव्हा साडेनऊ वाजले होते! शब्दांच्या पलीकडे परिपूर्ण करणारा असा हा अनुभव होता.

– रामचंद्र के., एक प्रकाश प्रवाहक

जागतिक प्रकाशप्रवहन दिनी सकाळी आठ वाजताच्या थेट सत्रात मी सामील झाले. काही सेकंदातच मी निर्विचारी अवस्थेत गेले आणि संपूर्ण सत्रात मला माझ्यात सखोल शांतता जाणवली.

पुन्हा रात्री नऊ वाजताच्या सत्रादरम्यान माझ्यातून प्रकाश वहात असताना माझ्यामध्ये शांतता आणि स्वतःचे अस्तित्व हरपण्याचा अनुभव हा शब्दांच्या पलीकडे होता. मला सत्र संपल्यावरही थांबायचे नव्हते आणि त्यातून बाहेर पडायचे नव्हते. हा एक अतिशय समाधानकारक आणि परिपूर्ण असा अनुभव होता.

– वेदावती, एक प्रकाश प्रवाहक

मी अलकासोबत प्रकाशप्रवहन सत्राचा खरेखर आनंद घेतला. जरी मी याआधी प्रकाश प्रवहन केले असले, तरी या मार्गदर्शक सत्राने अद्भुत स्पंदने आणि दैवी ऊर्जेशी जोडण्याची सखोल भावना निर्माण केली. माझ्यासाठी, प्रकाशप्रवहन हे स्वतःशी व स्त्रोताशी जोडण्याचा एक मार्ग आहे. प्रत्येक सत्रानंतर मला हलके, शांत व स्थिरचित्त वाटते. मी हीलिंगमध्ये सुद्धा त्याची शक्ती अनुभवली आहे – मग ते माझ्यासाठी असो किंवा ही सकारात्मक ऊर्जा इतरांबरोबर सामायिक करताना असो. केवळ एक सत्रदेखील सुसंवाद पुनर्संचयित करण्यात आणि नातेसंबंध मजबूत करण्यासाठी मदत करून उल्लेखनीय परिणाम घडवून आणू शकते.

– टीना नागपाल, एक प्रकाश प्रवाहक




प्रकाश प्रवहन हे मराठी द्वै-मासिक असून, त्याचे वितरण हे खाजगी आहे. मानसा फाउंडेशन (र) तर्फे प्रकाशन, मुद्रण आणि संपादकीय काम हे जयंत देशपांडे बघतात. प्रकाशन मानसा फाउंडेशन (र), तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर- बागलूर रोड), बंगलोर – ५६००७७, येथून आणि मुद्रण मे. लोटस प्रिंटर्स प्रा. लि., फोन २३३८०१६७/२३२०९९०९, ईमेल lotus.creation777@gmail.com, website: www.lotusprinters.com, मालकी हक्क: मानसा फाउंडेशन (र), तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर- बागलूर रोड), बंगलोर ५६००७७ संपादक: जयंत देशपांडे